# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.

ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025


Original Article

# मराठी ग्रामीण कादंबरी 'नांगरमुठी'तील पर्यावरण विषयक जाणीवा


**डॉ. कु.कोकिळा हनुमंत चांगण**

महाविद्यालयाचे नाव- शरदचंद्र पवार कॉलेज लोणंद,ता. खंडाळा,जि. सातारा

**Email-**kokilachangan1980@gmail.com



**Manuscript ID:**

JRD -2025-170910

ISSN: 2230-9578

Volume 17

Issue 9(A)

Pp. 48-52

September 2025

**Submitted:** 22 Aug. 2025

**Revised:** 3 Sept. 2025

**Accepted:** 21 Sept. 2025

**Published:** 30 Sept. 2025



***गोषवारा***

*जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी तसेच विकासासाठी आवश्यक असणारे आवरण म्हणजेच पर्यावरण होय. या आवरणातच जीवसृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि लय सामावलेला आहे. मानव हा या जीवसृष्टीतला महत्त्वाचा घटक आहे. या मानवनिर्मित साहित्यात संपूर्ण मानवी जीवन साकारले आहे. पर्यावरण हा मानवी जीवनाचा अविभाज्य आणि आवश्यक घटक साहित्यात येणे स्वाभाविकच आहे. ग्रामीण जीवन हे तर निसर्गाच्या कुशीतच वसलेले आहे. पांडुरंग पाटील यांच्या 'नांगरमुठी' या कादंबरीत पर्यावरण हा घटक कादंबरीचा केवळ भाग म्हणून नव्हे तर संपूर्ण कादंबरीची पार्श्वभूमी म्हणूनच येतो. कादंबरीच्या नावावरूनच आपल्या लक्षात येते की ही कादंबरी शेतीशी निगडित आहे. कादंबरीच्या सुरूवातीलाच अस्वल्या बैल मेल्याने त्यासाठी रडणारा औतेराव दिसतो. त्याने महापूराला समोरा जाऊन म्हैस व अस्वल्या बैलाला वाचवलेले असते. औतेरावचे वडील हरीपंत या प्राण्यांवर मुलाप्रमाणे प्रेम करत असतात. कादंबरीमध्ये निसर्गसौंदर्य वारंवार येत राहते. पर्यावरणातील ऊन, वारे, पाऊस, झाडे, वन्य प्राणी इत्यादींविषयीचेही प्रेम आपलेपणाच्या भावना या कादंबरीमध्ये दिसतात. गर्द झाडी, अनंत आकाश, डोंगर, नदी, ओढे, हिरवे माळ, आकाशातील चंद्र, तारे तसेच पक्षी-प्राणीसृष्टी यांची सुंदर वर्णने कादंबरीमध्ये आलेली आहेत. लेखकाने या कादंबरीमध्ये मानवी मनाचे भरण पोषण करणारा हा निसर्ग आहे याची वाचकांना जाणीव करून दिली आहे. याबद्दलची कृतज्ञता ही या ठिकाणी लेखकाने व्यक्त केली आहे. कधी कधी महापूर, दुष्काळ, रोगराई यांच्या रुपाने रौद्ररूप धारण करणाऱ्या या पर्यावरणाप्रती मानवाच्या मनात भीतीही आहे. पर्यावरणाप्रती या भावना जशा मानवी मनात आहेत तसेच मानवाने या पर्यावरणावरती स्वार्थासाठी घातलेला घाला आणि स्वतःचेच भविष्य धोक्यात आणल्याची चिंताही लेखकाने व्यक्त केली आहे.*

***सूचक शब्द -*** *पाऊस, वारा, गर्द झाडी, महापूर, दुष्काळ, डोंगर, शिवार, चंद्र, तारे, वीज*


## उद्दिष्ट्ये

१) 'नांगरमुठी' या कादंबरीतील मानव आणि पर्यावरण यांचा सहसंबंध बघणे.

२) पर्यावरणातील प्राणी, पक्षी आणि मानव यांच्यातील सहसंबंध बघणे.

३) पर्यावरणाप्रतीच्या कृतज्ञतेच्या भावनेचा शोध घेणे.

४) पर्यावरण संतुलनाचे महत्व जाणून घेणे.

## प्रस्तावना

ग्रामीण साहित्याची निर्मिती १९६० नंतर मोठ्या प्रमाणात झाली असली तरी पर्यावरण विषयक जाणीवा आणि महत्व हे १२ व्या शतकापासूनच्या मराठी साहित्यकृतीतून साहित्यिकांनी सांगितलेले दिसते.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*डॉ. कु.कोकिळा हनुमंत चांगण, महाविद्यालयाचे नाव- शरदचंद्र पवार कॉलेज लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा*



**How to cite this article:**

*चांगण, . कोकिळा . हनुमंत . (2025). मराठी ग्रामीण कादंबरी 'नांगरमुठी'तील पर्यावरण विषयक जाणीवा. Journal of Research and Development, 17(9(A)), 48–52.* https://doi.org/10.5281/zenodo.17510133

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.17510133

OPEN ACCESS

ज्ञानेश्वरांनी पृथ्वीला माता म्हणून सर्व सजीव सृष्टीचे ती पोषण करणारी आहे तिच्याबद्दल तसेच सावली, फळे देणाऱ्या झाडांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. तुकारामांचा 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे', हा अभंग सर्वज्ञातच आहे.१८व्या शतकात बळीबा पाटील, पिराजी पाटील या ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत, ज्यामध्ये पर्यावरण निसर्ग यांची चित्रे आली आहेत. हरिभाऊ आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेत दुष्काळाचे वर्णन आलेले आहे. व्यंकटेश माडगूळकर, द.मा. मिरासदार, शंकर पाटील, रणजित देसाई, आनंद यादव, रा. रं. बोराडे, सखा कालाल, बाबा पाटील, चारुता सागर, महादेव मोरे, भास्कर चंदनशिव, राजन गवस, उद्धव शेळके, बहिणाबाई चौधरी, बाबाराव मुसळे, अण्णाभाऊ साठे, आनंद पाटील, ना. धों. महानोर, इंद्रजीत भालेराव अशा अनेक साहित्यिकांच्या ग्रामीण साहित्यकृतीतून पर्यावरण विषयक जाणीवा प्रकट झालेल्या आहेत.

यापैकीच पांडुरंग पाटील यांची 'नांगरमुठी' ही शेतकरी व त्यांच्या कृषीजीवनावरील कादंबरी आहे. ही कादंबरी निसर्ग-पर्यावरण या वातावरणातूनच साकार होत असल्याचे लक्षात येते.

**निसर्ग सौंदर्याचा अनुभव -** 'नांगरमुठी' या कादंबरीमध्ये शेतकऱ्याचे कष्टमय जीवन, त्याला निसर्ग आणि परिस्थिती बरोबर करावा लागणारा सततचा संघर्ष याचे चित्रण येते. त्याचबरोबर हा शेतकरी निसर्गाच्या सहवासात असतो तो जो निसर्गसौंदर्याचा अनुभव घेतो तो पांडुरंग पाटील यांनी 'नांगरमुठी' या कादंबरीमध्ये वाचकांनाही दिला आहे. लेखकाने कादंबरीच्या सुरुवातीलाच पडणाऱ्या पावसाचे आणि निसर्ग सौंदर्याचे वर्णन केले आहे. पाऊस पडत असताना वारा इतका जोरदार होता की तो गर्द झाडांनाही गदा गदा हलवत होता. रातकिड्यांच्या किरकिरीचा जोश, रो रो करीत खळाळत जाणारा ओढा, भात खाचरात डराव डराव करणारं बेडूक. हे पर्यावरणाचे रूप बघायला मिळते.

एका ठिकाणी पांडुरंग पाटील म्हणतात, "ढगांच्या गादीत चंद्रमा पहुडला होता. पण तरीही बाकीचं आभूळ नितळलं होतं. खाटल्याच्या चांदण्या लुकलुकत होत्या. वारं वाहत होतं. त्यासोबत खळयावरच्या पातकऱ्यांचं हल्लोरीगीत ऐकू येत होतं."१ इथे हे निसर्गासौंदर्याचे रूप लेखकाने काव्यमय स्वरूपात वर्णिले आहे, जे वाचकांच्या डोळयासमोर उभा राहते. चांदाचा तुकडा कधी पिठूर पूरणागत प्रभा देतो तर कधी झाडांच्या गर्दराईतून डेऱ्यातल्या लोण्याच्या गोळयागत तरंगत आलेला दिसतो. गार वारा हवासा वाटतो. रात्रीच्या काळोखात काजव्यांचे घोस झाडपित झ्याक पुक करीत असल्याचे दिसतात. हा अनुभव अगदी सुखद आहे आणि तो या निसर्गाच्या सहवासातच मिळतो. "ग्रामीण जीवन आणि निसर्ग यांचा संबंध अतूट असतो निसर्गाच्या अंगा खांद्यावर खेळत ग्रामीण मनुष्य जगत असतो."२ शेतकरी हा कष्ट करणारा आहे या कष्टातही पर्यावरणाची त्याला साथ मिळाली की तो आनंदी आणि उत्साही मनाने अजून कष्ट करायला लागतो हे वरील वर्णनावरून लक्षात येते. निसर्ग सौंदर्य म्हटलं की डोळयांसमोर रंगीबेरंगी फुले, हिरवी सृष्टी येतेच. 'नांगरमुठी' कादंबरीतही निसर्गातील सौंदर्यात भर घालणारी रंगीबेरंगी फुलांचे वर्णने आली आहेत. बांधावर मंजिऱ्यांनी डवरलेली तुळस आहे. फुललेल्या झेंडूचा ताटवा दिसतो. आषाढ श्रावणाच्या सरी नंतर हिरवा झालेला निसर्ग भाद्रपदानंतर सृष्टीचं खुललेलं सौंदर्य बघायला मिळते. रानातल्या तिळाची पिवळी फुले, गुलजीची तांबडी चुटुक फुले, परसातला झेंडू यांच्या माळा रोज रोज घटावर चढतात.

**प्राणीजगत आणि त्यावरील प्रेम -** 'नांगरमुठी' या कादंबरीमध्ये वारकरी संप्रदायाचे संस्कार असणारे हरिपंत हे भूतदया जपणारे असल्याचे वारंवार दिसते. कादंबरीच्या सुरुवातीलाच अस्वल्याच्या मृत्यूने औतेराव तीन महिने झाले तरी रडत असतो. औतेरावाने म्हशीला मारले म्हणून हरिपंत दररोज त्या म्हशीला अंजारु गोंजारू लागतात. गावचे सरपंच जगताप त्यांची आई भगीरथी व गिरणीवाले भिकशेठ ही दररोज चिमण्यांना धान्य खाऊ घालत असतात. सदा भुतल्याने सशांची पकडून आणलेली पिल्लं हरिपंत २० रुपये देऊन त्यांची आई सशीनीजवळ सोडून येतात. आपल्या छोट्या नातवाला तान्याला सांगतात माय लेकराची ताटातूट करू नये. ज्वारीच्या ताटावर बुलबुल पक्षांनी घरटं केलं होतं. त्यामध्ये असणाऱ्या त्यांच्या पिल्लांची हरीपंत काळजी घेतात. शेंबड्या माशीच्या पंखाला दोरा बांधून तान्या खेळत असतो. हरीपंत त्या इवल्याश्या जीवाची सोडवणूक करून तान्याला असे इतरांच्या जीवाशी खेळू नये ही शिकवण देतात. नागाला बघून थरथर कापणारी साखरु मुंगसाणे त्याचे तुकडे केल्यानंतर तिचा जीव कळवळतो आणि ती म्हणते, "... कुठेतरी गेला असतास हे रान सोडून तर तु बी सुटला असतास नि मीबी" ३ पर्यावरणातील जीवसृष्टी विषयीची ही मानवी प्रेमभावना पांडुरंग पाटील यांनी या पात्रांच्या माध्यमातून व्यक्त केली आहे. यातून पर्यावरणातील सर्वच सजीव सृष्टी महत्त्वाची असल्याचे समजते आणि पर्यावरण संतुलनाचा संदेशही मिळतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

'नांगरमुठी' या कादंबरीमध्ये निसर्गाच्या कुशीमध्ये आनंदाने राहणाऱ्या इतर पशु पक्षांची वर्णने पांडुरंग पाटील यांनी या कादंबरीत केली आहेत. जुनाट पिंपळाच्या झाडाला ज्या मोठाल्या ढोली पडल्या होत्या त्यात घुबडांचा घुत्कार ऐकू येत असल्याचे पांडुरंग पाटील सांगतात. ओढ्याला पाणी आल्यानंतर खंड्या, भारद्वाज, कोतवाल, ससाणा हे पक्षी ओढ्याचा काठ सोडायला तयार नसतात. सुगीत पावसाची सर येऊन गेल्यानंतर दहिवलेले अंग झाडून पाखरे आनंदाने गाणे गाऊ लागतात. कावळे साळुंख्यांचा थवा खळयावरल्या भातातलं मरून पडलेलं लोदं कीड खाऊ लागतो. पक्षी व प्राणीसृष्टीचे असे सुंदर चित्र या कादंबरीत बघायला मिळते.

**पर्यावरणाचे देणे आणि त्याविषयीची कृतज्ञता-** निसर्ग हा वेगवेगळया रूपाने जीवसृष्टीला आवश्यक असणाऱ्या गोष्टी देत असतो याची जाणीव मानवाला आहे. हीच जाणीव या कादंबरीमध्ये लेखकाने वेगवेगळया घटना प्रसंगातून सांगितली आहे. शेतीसाठी आवश्यक असणारा पाऊस पडून उघडीप झाल्यानंतर जे पीक येते त्याचे वर्णन लेखकाने केले आहे. लेखक म्हणतो, "निबळून पडल्यालं नाचणं मान वर करून उठून बसलंत. मिटलेली बोंड उलघडली. हाताच्या पाची बोटागत वाऱ्याच्या झुळकीसंगट नाचू लागली. भुईमुगाच्या शेंगा भरू लागल्या. पिवळया तिळाची फुलं कडेनं उमलली. हिरव्यागार पातळावर जरीचा काठ असल्यागत दुरून दिसू लागलं. माळा मुरडातली हावळी भातं घवळायला लागली. ढोरागुरांच्या चाऱ्याला तजेला आला. शिवारात माणसांचा वावर वाढला. पावसाळभर शिणहाळ असणारं शिवार गजबजू लागलं."४ वरील वर्णनातून लेखकाने मानवाची निसर्गाच्या या देणगी प्रतीची कृतज्ञताच व्यक्त केली आहे. ही कृतज्ञता कधी शब्दातून व्यक्त होते तर कधी कृतीतून व्यक्त होते. काळी आई ही शेतकऱ्याची भरण पोषण करणारी दुसरी आईच असते ती जे भरभरून देते त्याप्रती उतराई होण्यासाठी शेतकरी काही रुढीपरंपरांच्या रूपाने विधी करतो. अगदी शेतात पेरणी करण्यापासून ते शेतात आलेलं पीक कापणी करून घरी नेण्यापर्यंत वेगवेगळया प्रसंगी या धरणी मातेची पूजा केली जाते. शेतामध्ये कुरी चालवण्या अगोदर या कुरीला रखमा ओटी बांधते आणि म्हणते, "भरली बांधली माझी मैनाSS असंच प्वाट पाणी पिकू दे! गुरढोरं मैंदाळा चारा खाऊद्यात. गडीमाणसं, पोरंबाळ सुखात राहूद्यात." ५ भुईंबपूजा म्हणजे भुईची म्हणजेच शेतजमीनीची विधीपूर्वक केलेली पूजा जी कृषीजीवनात महत्त्वाची मानली आहे. शेतातले पीक काढायला सुरुवात करण्या अगोदर या शेतामध्ये नैवेद्य दाखवून नारळ फोडला जातो. या पिकाची पूजा केली जाते आणि नंतरच कापणीला सुरुवात केली जाते. हरिपंत म्हणतात,"एक दाणा मातीत पुरला की शेकडोदाण्यांनी गोचाडलेलं कणीस तू देतोस तरी माणसाची हाव नाही संपत. राळयाच्या राशीच्या डोंगरा आडून सूर्याचा लाल भडक गोळा वर आला. दहिवलेल्या कणसावर किरणं पडताच रत्न, पाचू, माणिक जडवल्यगत ती दिसू लागली." ६ एके ठिकाणी औतेराव म्हणतो, "देवानं ही झाडंझुडं निर्माणच केली नसती तर? उन्हाच्या तडाख्यानं पाखरं, माणसं घायाळ झाली असती. एवढं आग्या ऊन अंगावर झेलायचं नि आसऱ्याला येणाऱ्याला सावली द्यायची. सर्व सजीव सृष्टीत माणूस उरफाटा. सावलीला बसून झाडावरच कुऱ्हाडीचा घाव घालण्याची त्याची नीच वृत्ती समद्या जीवसृष्टीवर घाला घालायला उठलीया."७ सतत पडणाऱ्या पावसाला थांबवण्यासाठी रकमा विस्तवाने भाजून पाहते त्याला शिव्या घालते तेव्हा रखमाचा मुलगा औतेराव म्हणतो, "आगं सगळया जगाचा राजा त्यो. कुणा एकासाठी नाही पडत. समद्या पिरथमीचं प्वाट त्येच्यावर अवलंबून हाय. तु जा म्हणून त्यो जाणार?"८ त्यानंतर रखमा हात जोडून पावसाला सावकाश पडण्याची विनंती करते. या पावसाप्रती शेतकऱ्याच्या मनात भीतीपेक्षा जास्त कृतज्ञताच आहे. म्हणूनच "पावसाला बाप मानून आणि मातीला आई म्हणून जगणारी गावची लेकरे ही,"९ असा शेतकऱ्यांचा उल्लेख मोहन पाटील यांनी केला आहे.

**पर्यावरणातील औषधी वनस्पतींचा उपयोग / आयुर्वेदाचे फायदे -** पर्यावरणातून मानवी जीवनासाठी एकंदरच जीवसृष्टीच्या पालन पोषणासाठी आवश्यक अशी अनेक संसाधने मिळत असतात. यातीलच एक म्हणजे निसर्गात सापडणाऱ्या औषधी वनस्पती. औतेरावाने दूध न देणाऱ्या म्हैशीला खूप मारल्यानंतर दुखावलेल्या म्हैशीला हरीपंत भाकरीमध्ये अस्वली या वनस्पतीच्या मुळया चारतात. चार दिवसानंतर ही म्हैस कासंडी भरून दूध देऊ लागते. फटकुऱ्या बैलाच्या शिंगातील जखमेला हरीपंतांनी किंजकीचा पाला चेचून त्याचा लेप बांधला. "झाडपाल्याच्या औषधांचा उपयोग कोणत्या रोगावर कसा करायचा हे शेत नांगरणाऱ्यास माहित होता. तो स्वतः आणि त्याची गुरेढोरे यांच्या आजारावरची सगळी वनौषधी समजून होता. या गोष्टी परंपरेने त्याला शिकवल्या. गरज म्हणून त्याने जतन केल्या."१० हरीपंतांना डोक्याला मार लागून जखम झाल्यानंतर रखमाने हाऱ्याचा पाला तळहातावर कुस्करून तो त्या जखमेवर बांधला. वरील सर्व प्रसंगांतून लक्षात येते की मानवनिर्मित औषध गोळयांपेक्षा पर्यावरणातून मिळणाऱ्या या औषधी वनस्पतींवर या पर्यावरणात राहणाऱ्या लोकांना जास्त विश्वास आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

**पर्यावरण संरक्षणाची जाणीव-** अगोदर कादंबरीतील रखमा घरात लागणारी मिरची, जोंधळं, भुईमूग, कडधान्य, माळवं, दळव, नाचणं, वरी, तीळ सगळ्या जिन्नसा स्वतः शेतात पिकवायची. फक्त साबण सोडाच विकत घ्यायची. शेतात शेणखताच्या गाड्यांच्या गाड्या सोडायच्या रासायनिक खत कमी प्रमाणात घालायची. सर्वच शेतकरी निसर्गाच्या अनुरूप होते. पण काळानुरूप बदल होत गेले. पैशाच्या हव्यासापोटी नगदी पिके घेण्यास शेतकऱ्याने सुरुवात केली. उसाचं क्षेत्र वाढलं. नदीकाठची हिरव्यागार गवताची कुरणं नाहीशी झाली. त्यावर झुलणारे फुलपाखरांचे थवे दिसेनासे झाले. दिवाळीनंतर सारं गवत कापलेलं रान मोकळं असायचं. गावची म्हसरं हुंदडत दात घासत फिरायची. पोरांचं छन्नी दांडूचं, गोट्यांचं डाव रंगायचे. तो गागाजा आता कायमचाच बंद पडला... डासांचं साम्राज्य वाढलं रोग बळावले. बैलं जाऊन ट्रॅक्टर आले. देशी बियाणे जाऊन संकरित वाण आले. कीटकनाशक, तणनाशकांचा मारा सुरू झाला. पाण्याची उपलब्धता भरपूर होऊन वापराला धरबंद उरला नाही. तगाची रानं पानतुंबी होऊन नापीक होऊ लागली. माळाचं मळं झालं नि मळयांची गोठणटक्की झाली. मातीची घर ढासळून सिमेंटच्या पॅक बंद पेट्या उभ्या राहू लागल्या. पिकांवर पडणारे रोग, दुष्काळ, महापूर सारे निसर्गचक्र विस्कळीत होत असल्याचे चित्र 'नांगरमुठी' कादंबरीतून दिसून येते. पूर्वी ज्या डोंगर उतारावर सागाच घनदाट जंगल होतं. त्यातील झाडांची बरीच तोड झालयाने. गवत वाढू लागले. या जंगलातून हरणाचे कळपच्या कळप खालच्या माळरानाकडे येऊ लागले. हरणे संपली. दाजीपूरच्या डोंगरांचं बॉक्साईटसाठी उत्खनन झाले. माणूस वस्ती आणि आरण्य यामधील भिंतच नाहीशी झाली आणि गव्यारेड्यांचे दर्शन नित्याचे झाले. एक एक गाव शिवार ओलांडत ते आपली सीमा वाढवू लागले. मनुष्य आणि वन्यप्राणी यांच्यातील संघर्ष वाढण्याची वाढू लागल्याचे पांडुरंग पाटील कादंबरीमध्ये सांगतात. माणूस जसजसा प्रगत होत गेला तसतसा तो बुद्धीच्या जोरावरती पर्यावरणावर वर्चस्व गाजवून स्वतःला समृद्ध संपन्न बनवू लागला. पर्यावरणाला ओरबडण्याची त्याची हाव वाढत गेली. पर्यावरणाचे संतुलन ढासळू लागले, त्यामुळे काही नैसर्गिक आपत्ती येऊ लागल्या. विशेषतः पर्यावरणावर अवलंबून राहून शेती करणाऱ्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना या संकटांना तोंड द्यावे लागले आहे आणि आजही लागत आहे. "ग्रामीण जीवन म्हणजे फक्त कल्पनेतला सुखद निसर्ग नव्हे. ग्रामीण माणसाला निसर्ग सहवास लाभतो, पण निसर्गामुळे निसर्गाच्या कोपामुळे येणाऱ्या आपत्तींना तोंड द्यावे लागते."११ परिणामतः महापूर, दुष्काळ, रोगराई वाढल्याने मानवी जीवन अडचणीत आले. मानवाने स्वतःची मर्यादा ओलांडली त्यामुळे पर्यावरणाला पर्यावरणातील इतर वन्यजीवांनाही त्यांची मर्यादा ओलांडावी लागली. म्हणजे पुन्हा एकदा निसर्ग स्वतःचे श्रेष्ठत्व सिद्ध करत आहे येऊ घातलेल्या संकटांपुढे मानव पुन्हा एकदा हतबल असमर्थ होताना दिसत आहे आणि पुन्हा एकदा त्याला पर्यावरणाला निसर्गालाच शरण जावे लागत आहे असे सिद्ध होते. "सामान्य माणूस आपल्या निसर्गसिद्ध प्रदेशात फुलतो नव्हे तर त्याच्या संपूर्ण जीवनाला निसर्गच आकार देत असतो प्रकृती हीच त्याच्या जीवनाची अंतिम नियंत्रक शक्ती असते,"१२हेच खरे आहे.

**समारोप**

'नांगरमुठी' कादंबरीतून पांडुरंग पाटील यांनी ग्रामीण जीवनातील शेतकऱ्याच्या पर्यावरण विषयक विविध जाणीवा व्यक्त केल्या आहेत. मानवी अस्तित्वा प्रमाणेच पर्यावरणातील इतरही जीवसृष्टीचे अस्तित्व महत्वाचे आहे हे लक्षात येते. सजीवसृष्टीला जगण्यासाठी निसर्ग भरभरून देतो म्हणून त्या प्रती कृतज्ञतेचा भावही मानवी मनात आहे हे कादंबरीतून दिसते. तसेच नैसर्गिक संकटांविषयीची भीतीही आहे. आधुनिकीकरणाच्या नावाखाली प्रगती करत असताना जंगलतोडी सारख्या चुकीच्या कृतीने आपण आपलेच भविष्य धोक्यात आणल्याची चिंता ही या कादंबरीतून दिसते.

**निष्कर्ष**

१) 'नांगरमुठी' कादंबरीतून पर्यावरणाशिवाय मानवाचे अस्तित्व नाही इतके मानव आणि निसर्गाचे नाते अतूट असल्याचे लक्षात येते.

२) निसर्गाच्या सहवासात मानवी मनाचे भरण पोषण होते आणि याच समृद्ध मनाने मानव पर्यावरणातील इतर प्राणीसृष्टी वरती प्रेम करतो असे 'नांगरमुठी' कादंबरीमध्ये दिसते.

३) भरभरून देणाऱ्या निसर्गाप्रतीची कृतज्ञतेची मानवी भावना या कादंबरीतून व्यक्त झाली आहे.

४) आपल्याच कृतीमुळे निसर्गाचा समतोल ढासळून आपलेच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीचे अस्तित्व आपण धोक्यात आणत असल्याची चिंताही या कादंबरीतून व्यक्त झाली आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9(A)| September 2025

**संदर्भ ग्रंथसूची :**


1. पाटील, पांडुरंग; नांगरमुठी,
2. दर्या प्रकाशन, पुणे; द्वितीय आवृत्ती, ऑगस्ट २०२५
3. पृ. क्र. २२/२३
4. डॉ. गुंदेकर, श्रीराम; ग्रामीण साहित्य: प्रेरणा आणि प्रयोजन , दिलीप राज प्रकाशन पुणे, १५ ऑगस्ट १९९९. पृ. क्र. २४
5. पाटील, पांडुरंग; उनि., पृ. क्र.१६२
6. पाटील, पांडुरंग; उनि., पृ. क्र.१२
7. पाटील, पांडुरंग; उनि पृ. क्र.९८
8. पाटील, पांडुरंग; उनि. पृ.क्र. ६३
9. पाटील, पांडुरंग; उनि. पृ.क्र.११६
10. पाटील, पांडुरंग; उनि. पृ. क्र.२१
11. पाटील, मोहन; ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृती जुलै २००२, पृ. क्र.७०
12. तत्रैव, पृ. क्र. ९७
13. उणि. ग्रामीण साहित्य: प्रेरणा आणि प्रयोजन, डॉ. श्रीराम गुंदेकर पृ.क्र २७
14. जगनाळे, डॉ. रेखा; प्रादेशिक ग्रामीण साहित्य समीक्षेची समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर; प्रथम आवृत्ती ३१ मार्च २००७ पान नंबर ११.